अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १६७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास करता येणार : सरनाईक

✔ **मुंबई** : एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एस.टी.च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकिय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# संगीतबारीचे जॅकेट, आत 'सेक्स रॅकेट'

# पोलीस आऊट पोस्ट समोरच 'स्वरांजली' गोविंद बर्गे मॅटरमधील 'पूजा' सापडली!

✔ सोलापूर-मोडनिंब/प्रतिनिधी

**गाणं, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेला महाराष्ट्राचा अत्यंत लोकप्रिय नृत्य कला प्रकार किंबहुना महाराष्ट्राच्या संस्कृतीचं लेणं म्हणजे 'लावणी'. या कला प्रकाराचं आजवर कित्येक वर्षे जतन संगितबारी थिएटर्स अथवा केला केंद्रांमधून ज्या गावात झालं, लावणीची पंढरी तथा सांस्कृतिक नगरी म्हणून जे मोडनिंब (ता.माढा) हे गाव आजवर उभ्या महाराष्ट्रात परिचित राहिलं. त्याच लावणी पंढरीच्या गावात चक्क संगितबारी थिएटर म्हणजे कला केंद्राच्या आडून 'सेक्स' रॅकेट चालवण्याच्या प्रकरणाचा भांडाफोड झाला. इथल्या ज्या 'स्वरांजली' कला केंद्रात हाय प्रोफाईल अश्लील पार्ट्यांचं आयोजन केलं जायचं, जिथं कुंटुणखाना चालवला जायचा त्या कला केंद्रांच्या कृत्यानं लोककला संवर्धनाच्या भिंती काळवंडल्या गेल्या.**



जिथं लावणी, बतावणी, सवाल-जबाब, गण-गौंळण यांच्या सादरीकरणातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कलांचं सादरीकरण होतं, नुसतं सादरीकरणच नव्हे, तर जतन होतं, जे सादरीकरण पाहायला चांद्यापासून ते बांद्यापर्यंतचे रसिक लोक मोठ्या हौशेने यायचे आणि आजही येतात, जिथं नटराजाची पुजा बांधली जाते. दिवस रात्र- जिथं घुगरांची छमछम ऐकायला येते, त्याच सांस्कृतिक पंढरींत चक्क कला केंद्राच्या आडून सेक्स रॅकेट चालवणं म्हणजे महाराष्ट्राच्या लोककलेवर घाला घालण्याचा प्रकार होत होता, अशा संतापजनक प्रतिक्रिया सामाजिक आणि कला क्षेत्रातून उमटत आहेत.

विशेष करुन ज्या स्वरांजली कला केंद्रामध्ये हायप्रोफाईल सेक्स रॅकेट चालवलं जायचं ते केंद्र इथल्या पोलीस औट पोस्टच्या अगदी समोर आणि हाकेच्या अंतरावर आहे. कला केंद्रात कुंटणखाणा चालवण्याचा प्रकार पोलिसांच्या नजरेस आजवर कसा आला नाही? त्याची कुणकुण 'खाकी'वर्दीला कशी लागली नसावी? कोणाच्या आशीर्वादानं इथं लोककलेवर घाला घालण्याचा प्रकार सुरु होता?

## गोविंद बर्गे प्रकरणातील नर्तिका सापडली रॅकेटमध्ये!

✔ **सोलापूर** : मोडनिंबच्या स्वरांजली केंद्र प्रकरणातील सर्वात मोठी धक्कादायक बाब म्हणजे बीड जिल्ह्यातील लुखामसला गावचे उपसरपंच गोविंद बर्गे यांच्या आत्महत्या प्रकरणातील मुख्य नर्तिकेचा समावेश पिडित महिलांमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे. विशेषत्वे, तिने पोलिसांसमोर याप्रकरणी कबुली दिल्याची माहिती टेंभुर्णी पोलिस सुत्रांकडून मिळाली आहे. बर्गे आत्महत्या प्रकरणात नर्तिका पुजाला मागच्या काही महिन्यांपूर्वीच जामीन मिळाला आहे. त्यानंतर काही दिवसांपूर्वी ती मोडनिंबच्या स्वरांजली कला केंद्रात दाखल झाली होती. टेंभुर्णी पोलिसांनी टाकलेल्या धाडीत ती पुन्हा अडकली आहे. तिला सोलापूरच्या सुधारगृहात पाठवण्यात आलं आहे.

सासुरे (ता.बार्शी) येथील बहुचर्चित नर्तिका पूजा या प्रकरणात सापडल्याने सोलापूर जिल्ह्यात खळबळ माजली आहे. बीड जिल्ह्यातील माजी उपसरपंच गोविंद बर्गे प्रकरणातील नर्तिका पूजा गायकवाडने टेंभूर्णी पोलिसांसमोर मोठी कबुली दिली आहे. यात तिने मोडनिंब येथील कला केंद्रात सुरू असलेल्या रॅकेटमध्ये स्वत: अडकल्याचं सांगितलं आहे.



मृत : गोविंद बर्गे



पुजा गायकवाड


माजी उपसरपंच बर्गेसोबत आपले प्रेमसंबंध असल्याचं पूजाने यापूर्वीच पोलिसांना सांगितलं होतं. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील लुखामसला गावचे माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे यांचा सोलापूर जिल्ह्यातील सासुरे गावात त्यांच्याच कारमध्ये मृतदेह सापडला होता. त्यांच्या गाडीत दारूच्या बाटल्याही सापडल्या होत्या. तर बर्गे नी बंदुकीतून गोळी झाडून आत्महत्या केली होती. धक्कादायक म्हणजे ही घटना नर्तिका पूजा गायकवाडच्या घरासमोर असणाऱ्या मोकळ्या जागेत घडली होती. यप्रकरणातून नर्तिका पुजा हिला अटक करण्यात आली होती. तिला अनेक दिवस जेलमध्ये राहावे लागले होते.

### बड्या माशांना 'क्लिन चिट' मिळण्याची चर्चा

कला केंद्रावर महिलांना नृत्याच्या नावाखाली अनैतिक कामं करायला भाग पाडलं जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. आता या प्रकरणात पोलिसांच्या तपासात आणखी मोठे धक्कादायक खुलासे समोर येणार आहेत. कला केंद्राच्या नावाखाली वेश्यांचा कुंटणखाणा आणि हाय प्रोफाईल अश्लिल पार्ट्यांचं आयोजन केलं जायचं ते कोणाच्या आशीवार्दानं यासंबंधी आता मोडनिंबसह सोलापूर जिल्ह्यात चर्चा सुरु झाली आहे. त्याचबरोबर वशिलेबाजीतून या प्रकरणातील दोषी बड्या माशांना न गोवता त्यांना 'क्लिन' चिट मिळणार असल्याचीदेखील चर्चा माढा तालुक्यात सुरु आहे.

### नावाला फक्त कला केंद्र

### नृत्याच्या नावाखाली अनैतिक कामं, आक्षपार्ह साहित्य जप्त



आयपीएस अधिकारी राहुल आत्राम यांच्या पथकाने केलेल्या धाडीत अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या. केंद्रातून मोठ्या प्रमाणात अश्लील साहित्य, मोबाईल, रेकॉर्डिंग डिव्हाइसेस जप्त करण्यात आले आहेत. पिडित तरुणींना बाहेरून आणून येथे कोंडून ठेवण्यात येत होते. त्यांना नृत्याच्या नावाखाली ग्राहकांसमोर उभे करून अनैतिक कामे करायला भाग पाडले जात होते.

## घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी १२ हजारांची लाच

- उंबरगावचे ग्रामपंचायत अधिकारी व शिपाई एसीबीच्या जाळ्यात
- पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया

✔ सोलापूर/प्रतिनिधी

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी लाभार्थ्याकडून लाच मागितल्याप्रकरणी उंबरगाव (ता. पंढरपूर) येथील ग्रामपंचायत अधिकारी आणि शिपाई यांना सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून पकडले. या कारवाईत ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय अभिमान कांबळे यांनी तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणातील आरोपींमध्ये प्रशांत प्रकाश मुकरे (वय ४५), ग्रामपंचायत अधिकारी उंबरगाव, पंचायत समिती पंढरपूर तसेच दत्तात्रय अभिमान कांबळे

(अधिक वृत्त पान ७ वर...)

शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी कोणतेही काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. अशा प्रकरणांमध्ये एसीबीकडून कठोर कारवाई करण्यात येते.

–**प्रशांत चौगुले**, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर

**सोलापूर शहराचे तापमान**

कमाल तापमान **३९.३**


### मर्डर पचवायला गेले पण पोलिसांनी अचूक हेरलं

## वृद्धांच्या मर्डर प्रकरणात दोघा सख्ख्या पुतण्यांचा 'करेक्ट' कार्यक्रम!


### घर जागेच्या प्रापर्टीसाठीच काका-काकीचा खून केल्याचे तपासात उघड | एमआयडीसी पोलिसांकडून मारेकरी २४ तासांत जेरबंद

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापुरातील स्वागतनगर परिसरातील रस्त्यालगतच्या कृष्णानगर येथे महादेव नरसप्पा मंचाळ (वय ६८) आणि त्यांच्या पत्नी रंगम्मा (६२) या दाम्पत्याचा मर्डर झाला होता. दरम्यान त्यांचे पुतणे विकास रामचंद्र मंचाळ (वय२३) आणि राहुल रामचंद्र मंचाळ (वय २५) या दोघांनी घरजागेच्या प्रॉपर्टीवरुन या दोघांचा मर्डर केल्याचे पोलीस तपासांतून उघड झाले असून यप्रकरणी दोघांना एमआयडीसी पोलिसांनी सोमवार (ता.१६) रोजी अवघ्या २४ तासांत अटक केली.



महादेव मंचाळ



रंगम्मा मंचाळ

काका-काकीला यमसदनी पाठवलेले हे दोघे सख्खे भाऊ मर्डर करुनदेखील 'तो मी नव्हेच' या भूमिकेत वावरत होते. मात्र तांत्रिक कौशल्य आणि मिळालेली गुप्त माहिती या आधारे हे संशयित पोलिसांच्या नजरेतून सुटले नाहीत. अखेर त्यांना जेरबंद करण्याचा 'करेक्ट' कार्यक्रम एमआयडीसी पोलिसांनी केला.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### निलंकठवरचा संशय चुकीचा, त्यांनी महादेवांच्या घराचे बांधकाम केले होते सुरु

वास्तविक घर जागा सोडण्याचा वाद हा मृत महादेव आणि त्यांचा भाऊ रामचंद्र व त्यांची मुले यांच्यात होता. मात्र पोलिसांनी मिळालेली प्राथमिक माहिती वेगळी होती. निलंकठ यांच्याच मालकीचे ते घर आहे, आणि त्यांचाच तगादा घर सोडण्यासाठी होता, त्यातून वाद होत होता, अशी माहिती मिळाली होती. मात्र ती चुकीची होती. उलट निलंकठ मंचाळ यांनी मृत महादेव यांच्यासाठी कृष्णानगरमध्येच घराचे बांधकाम सुरु केले होते, अशी वस्तुनिष्ठ माहिती पोलिसांना तपासून मिळाली आहे. हीच माहिती पोलिसांकडून सोमवारी प्रसिद्धी माध्यमांना देण्यात आली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लाल दिवा माझ्या आवडीचा !

कल्याण
249-58-224

मुंबई
579-11-669

4 6 8

# भावाच्या मदतीत बायकोने नवऱ्याचा काढला काटा; डोक्यात दगड घालून सुरीने वार करुन निघृण हत्या!

### नातेपुतेमधील घटनेने खळबळ : बारामतीला राहायला जाण्यावरुन केला मर्डर

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सख्ख्या भावाच्या मदतीने डोक्यात दगड घालण्यासह कानावर सुरीने सपासप वार करुन नवऱ्याचा कायमचा काटा काढल्याची घटना माळशिरस तालुक्यातील नातेपुते येथे घडली आहे. विजय डौग्या भोसले (वय २५) असे खून झालेल्या नवऱ्याचे नाव आहे. बारामतीला राहायला जाण्याच्या किरकोळ कारणावरुन हा मर्डर झाल्याचे पोलिसांनी सांगितले. निघृण हत्येच्या या धक्कादायक प्रकरणात मुख्य आरोपीला पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली आहे.

मौजे नातेपुते येथे दि. १४ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास पर्वतेश्वर माळ, नातेपुते (ता. माळशिरस) येथे विजय डौग्या भोसले यांच्या खुनाची घटना घडली आहे. पत्नी कांती विजय भोसले व तिचा भाऊ यया बिऱ्या काळे (रा. बारामती, ता. बारामती, जि. पुणे) यांनी विजय भोसले याला 'बारामतीला राहायला चल' असे सांगून त्याच्याशी वाद घातला. त्यानंतर झालेल्या भांडणात यया बिऱ्या काळे याने विजय भोसले यांच्या डोक्यात दगड मारला, तर कांती भोसले हिने सुरीने त्यांच्या कानावर सपासप अमानुष वार केले. त्यानंतर दोघांनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या दरम्यान विजय भोसले यांचा मृत्यू झाला.

#### साताऱ्या जिल्ह्यातून खुनी यया बिऱ्याला उचलले

नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विशाल वायकर यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीचा यया बिऱ्याचा माग काढला. तो सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याचा पाठलाग करत रहिमतपूर येथून त्याला ताब्यात घेतले, गुन्हा घडल्यापासून अवघ्या २४ तासांत मुख्य आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

#### बायको कांतीने दिली गुन्ह्याची कबुली

चौकशीदरम्यान कांती भोसले हिने हा खून आपण भाऊ आणि यया बिऱ्या काळे यांनी मिळून केल्याची कबुली दिली. दरम्यान मुख्य आरोपी यया बिऱ्या काळे हा फरार झाला होता.



**नातेपुते : विजय भोसलेंच्या निघृण हत्येप्रकरणी संशयित आरोपी यया बिऱ्या याला ताब्यात घेतल्यानंतर नातेपुते पोलीस ठाण्याचे पथक.**

या प्रकरणी फिर्यादीवरून नातेपुते पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)